# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:01.09.2025** **वार:सोमवार**

---

1. चीनमधील एससीओ शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यादरम्यान सीमावर्ती भागात शांतता राखण्यावर सहमती;
2. जागतिक व्यापार स्थिर करण्यासाठी दोन्ही अर्थव्यवस्थांची महत्त्वाची भूमिका असल्याचं उभय देशांचं मत.
3. आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात नागरिकांनी भारतीय उत्पादनांना पाठिंबा देऊन सण साजरे करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन.
4. फाउंडेशन टू एज्युकेट गर्ल्स ग्लोबली संस्थेला यावर्षीचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार आणि
5. जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्ये पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर युद्ध पातळीवर बचाव आणि मदत कार्य सुरू

**<u>मोदी-चीन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनमधील तियानजिन इथे एससीओ अर्थात शांघाय सहकार्य संघटना शिखर परिषदेच्या पूर्ण सत्राला संबोधित करत आहेत. एससीओ छत्राखाली प्रादेशिक सहकार्य वाढवण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाची रूपरेषा पंतप्रधान मांडणार आहेत. या शिखर परिषदेच्या सत्रानंतर, पंतप्रधान आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेणार आहेत.

तत्पूर्वी काल, पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी भारत आणि चीनमधील द्विपक्षीय संबंधांच्या पुनर्बांधणीवर लक्ष केंद्रित करून व्यापक चर्चा केली. बैठकीत द्विपक्षीय संबंधांच्या निरंतर विकासासाठी सीमावर्ती भागात शांतता राखण्याचं महत्त्व मोदी यांनी अधोरेखित केलं. यावर उभय नेत्यांमध्ये सहमती झाली. यावेळी सीमेवरील शांतता ही भारत-चीन संबंधांसाठी एखाद्या विमा पॉलिसीप्रमाणे असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी चीनच्या राष्ट्राध्यक्षांना स्पष्ट शब्दात सांगितलं.

जागतिक व्यापार स्थिर करण्यासाठी आपल्या अर्थव्यवस्थांची भूमिका महत्वाची असल्याचं उभय नेत्यांनी मान्य केलं. द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक संबंध वाढविण्यासाठी आणि व्यापार तूट कमी करण्यासाठी राजकीय आणि धोरणात्मक दिशेनं पुढे जाण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

**<u>पंतप्रधान-मन की बात</u>**

भारतातल्या स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्होकल फॉर लोकल, आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत या मंत्रांसह प्रगती करावी लागेल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. आकाशवाणीवरून 'मन की बात' कार्यक्रमातून त्यांनी देशवासियांना पुन्हा एकदा स्वदेशीचा आग्रह धरण्याचं आवाहन केलं...

**आने वाले दिनों में बहुत सारे त्योहारों की रौनक होगी। इन त्योहारों में आपको स्वदेशी की बात कभी भी भूलनी नहीं है। उपहार वही जो भारत में बना हो, पहनावा वही जो भारत में बुना हो, सजावट वही जो भारत में बने सामान से हो, और भी ऐसा बहुत कुछ। एक ही मंत्र 'वोकल फॉर लोकल', एक ही रास्ता 'आत्मनिर्भर भारत', एक ही लक्ष्य 'विकसित भारत' ।**

सणावारांच्या काळात स्वच्छता राखण्यावर भर देताना स्वच्छता असेल तर सणउत्सवांचा आनंद द्विगुणित होत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. एक भारत श्रेष्ठ भारताची भावना देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यामध्ये क्रीडा क्षेत्राची भूमिका मोठी आहे. यंदा प्रथमच काश्मीरमध्ये आयोजित खेलो इंडिया जल क्रीडा स्पर्धांविषयी त्यांनी चर्चा केली. यामध्ये देशभरातून 800 खेळाडू सहभागी झाल्याचं त्यांनी सांगितलं, शिवाय त्यामध्ये महिला खेळाडूंची संख्या लक्षणीय असल्याचं त्यांनी नमूद केलं.

गेल्या काही दिवसांत निसर्गाच्या प्रकोपाची चर्चा करताना, हा काळ संपूर्ण देशाची कसोटी पाहाणारा असल्याचं सांगून भूस्खलनाचा कहर झाल्याचं नमूद केलं. आपत्ती काळात स्थानिक, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर आणि प्रशासनानं झोकून देऊन काम केलं. सर्वांनीच मानवतेला अग्रक्रम दिल्याचं सांगत, बचाव कार्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याची माहिती मोदी यांनी दिली.

**<u>जीडीपी-रीजीजू</u>**

या तिमाहीत 7.8 टक्के जीडीपी वाढीने हे सिद्ध केलं  आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदींपेक्षा कोणीही अर्थव्यवस्था चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करू शकत नाही. असं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी नवी दिल्लीतील भगवान बिरसा मुंडा भवन इथे बिरसा मुंडा पुतळ्याचं अनावरण केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. पंतप्रधान मोदी भारतीय अर्थव्यवस्था सर्वोत्तम पद्धतीने चालवत आहेत असं जगातील अव्वल अर्थशास्त्रज्ञ म्हणत आहेत. भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणे आणि स्वदेशीचा अवलंब करणे आवश्यक आहे. असंही त्यांनी सांगितलं.

**<u>रॅमन मॅगसेसे पुरस्कार</u>**

'फाउंडेशन टू एज्युकेट गर्ल्स ग्लोबली' या भारतीय स्वयंसेवी संस्थेला यावर्षीचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेता म्हणून घोषित करण्यात आलं आहे. भारतातील ग्रामीण आणि शैक्षणिकदृष्ट्या वंचित भागात मुलींच्या शिक्षणासाठी समुदाय आणि सरकारी संसाधने एकत्रित करण्यासाठी ही संस्था काम करते. 2025 च्या इतर विजेत्यांमध्ये पर्यावरणीय कार्यासाठी मालदीवमधील शाहिना अली आणि फिलीपिन्समधील फ्लेवियानो अँटोनियो एल. विलानुएवा यांचा समावेश आहे. 67 वा रॅमन मॅगसेसे पुरस्कार वितरण सोहळा 7 नोव्हेंबरला फिलीपिन्समधील मनिला इथे होणार आहे.

**<u>एलपीजी</u>**

तेल विक्री कंपन्यांनी व्यवसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत 51 रुपये 50 पैशांची कपात केली आहे. दिल्लीत 19 किलोचा व्यवसायिक एलपीजी सिलिंडर आता 1580 रुपयांना उपलब्ध होईल. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत मात्र कोणताही बदल झालेला नाही.

**<u>गौरी</u>**

गौराई आली सोन्या-मोत्याच्या पावलांनी असं म्हणत ज्येष्ठा कनिष्ठा गौरी अर्थात महालक्ष्मींचं काल महाराष्ट्रात घरोघरी मोठ्या उत्साहात आगमन झालं. खड्याच्या गौरी, शाडू, माती अथवा पितळी मुखवट्याच्या गौरी, तेरड्याच्या गौरी आकर्षक रांगोळी आणि फुलांच्या सजावटीसह घरोघरी विराजमान झाल्या. त्यांच्यासमोर धान्य, फळे, फराळ, डाळी आदींची आरास केली जाते. आज घरोघरी गौरीपूजन होईल. दरम्यान, पाच दिवसांच्या घरगुती गणपतींचं काल विसर्जन करण्यात आलं.

**<u>अमित शहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज जम्मूला प्रत्यक्ष भेट देऊन तिथे सुरू असलेल्या बचाव आणि मदत कार्याचा आढावा घेणार आहेत. ढगफुटी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानाचं मूल्यांकनही शहा करणार आहेत. या एकदिवसीय दौऱ्यात, गृहमंत्री जम्मूमधील पूरग्रस्त भागांचं हवाई सर्वेक्षण करून अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन या भागातल्या बाधित कुटुंबांना भेट देणार आहेत. कटरा इथल्या श्री माता वैष्णो देवी बेस कॅम्प बरोबरच विविध पूरग्रस्त भागांनाही ते भेट देतील.

**आपत्ती**

जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्ये पूरस्थिती असून बचाव आणि मदत कार्य जोरात सुरू आहे. उत्तराखंडच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि सुविधा यांना सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिलं आहे, तसंच सर्व विभाग जलद मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी समन्वयानं काम करत असल्याची माहिती मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी दिली आहे. हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस सुरूच आहे. सततच्या पावसामुळे पंजाबमध्ये भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. राज्य सरकारनं शाळांची सुटी बुधवारपर्यंत वाढवली आहे. बचाव आणि मदत कार्य चोवीस तास सुरू असल्याचं आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

गृह मंत्रालयानं हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि जम्मू-काश्मीरसाठी मुसळधार पाऊस, अचानक आलेला पूर, ढगफुटी आणि भूस्खलनामुळे झालेल्या नुकसानाचं मूल्यांकन करण्यासाठी आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथकं स्थापन केली आहेत. ही केंद्रीय पथकं या प्रदेशातील पूर आणि भूस्खलनग्रस्त जिल्ह्यांना भेट देणार आहेत. प्रत्येक पथकाचं नेतृत्व मंत्रालय किंवा राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संयुक्त सचिव पातळीवरील एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडे असणार आहे. दरम्यान, भारतीय हवामान खात्यानं हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये आज मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

**हॉकी आशिया**

बिहारमध्ये आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात भारतानं जपानवर मात केली. अत्यंत चुरशीच्या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगनं दोन तर मनदीपनं एक गोल केला. भारतानं आता सुपर चारमध्ये प्रवेश केला आहे.

**अफगाणिस्तान-भूकंप**

काल रात्री उशिरा आग्नेय अफगाणिस्तानला 6.0 रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे (USGS) ने गातातबो माहिती नुसार, जलालाबादच्या पूर्व-ईशान्येला 27 किलोमीटर अंतरावर भारतीय वेळेनुसार रात्री 12 वाजून 47 मिनिटांनी 8 किलोमीटर खोलीवर भूकंपाची नोंद झाली. सुमारे 20 मिनिटांनी, नांगरहार प्रांतात 10 किलोमीटर खोलीवर 4.5 रिश्टर स्केलचा आणखी एक भूकंप झाला. भूकंपात किमान नऊ जणांचा मृत्यू झाला आणि 15 जण जखमी झाले. तालिबान सरकारी अधिकाऱ्यांनी दुर्गम पर्वतीय भागात बचावकार्यात मदत करण्यासाठी मदत संस्थांना आवाहन केलं आहे. दिल्ली-एनसीआरसह संपूर्ण पाकिस्तान आणि उत्तर भारतातही भूकंपाचे धक्के जाणवले.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसासह एक दोन ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाचा लाल रंगाचा इशारा जारी केला आहे. पुढील दोन दिवसांत पूर्व राजस्थान, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, ओडिशा, पंजाब आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**